दै. देशोन्नती दि. 26/03/2022

ल्हा दै. देशोन्नती दि. 26/03/2022 नांदेड, श

# पोलिसांवर हल्ला करणारा आरोपी वजिराबाद पोलिसांच्या ताब्यात

देशोन्नती वृत्तसंकलन...

**नांदेड** ■ गतवर्षातील मार्च महिण्यात हल्लामोहल्ला मिरवणुकी दरम्यान पोलिस व पोलिस वाहनांवर हल्ला करुन गुन्हा दाखल झाल्यानंतर फरार झालेल्या आरोपीस वजिराबाद पोलिसांनी २३ मार्च रोजी ताब्यात घेतले.

सचखंड गुरुद्वारा परिसरात हल्लामोहल्ला मिरवणुक काढण्यात आली. २९ मार्च २०२१ रोजी मिरवणुक काढल्यानंतर दंगल झाली होती. यावेळी बंदोबस्तासाठी असलेले पोलिस अधिकारी, कर्मचारी व पोलिस वाहनांवर हल्ला करुन पोलिस वाहनाचे नुकसान करुन पोलिसांना जखमी केले होते. या प्रकरणी वजिराबाद पोलिसांनी गुन्हा दाखल केलेला आहे. दरम्यान यातील आरोपी हरविंदर उर्फ लक्की गुरुदिपसिंघ लांगरी उर्फ टप्पेवाले (२३) हा फरार झाला होता. सदर आरोपी हा त्याच्या राहत्या घरी बडपुरा येथे आल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीवरुन उपविभागीय पोलिस अधिकारी चंद्रसेन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि जगदिश भंडरवार व त्यांच्या पथकाने घरावर छापा मारुन २३ मार्च रोजी ताब्यात घेतले. त्याच्या घराची झडती घेतली असता घरात तलवार आढळून आली असून पोलिसांनी ती जप्त केली. या प्रकरणी पोना गजानन किडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन वजिराबाद पोलिसांनी भारतीय हत्यार कायद्यानुसार गुन्हा दाखल केला असून या प्रकरणाचा पुढील तपास सपोनि निलपत्रेवार हे करीत आहेत. सदर आरोपीविरुध्द २४ मार्च रोजी स्थानिक गुन्हे शाखेत चॅप्टर केस नंबर १६/२००० कलम ११० अन्वये प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे.

दै. लोकमत दि. 26/03/2022

# हल्ला करणारा अटकेत

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड :** मागील वर्षी हल्ला महल्ला मिरवणुकी दरम्यान पोलिसांवर हल्ला करण्यात आला. यावेळी पोलिसांची वाहनेही फोडण्यात आली होती. या प्रकरणातील फरार असलेल्या हरविंदर गुरुदीपसिंघ लांगरी उर्फ टपेवाले रा.बडपुरा गेट याला वजिराबाद पोलिसांनी पकडले आहे.

दसऱ्या निमित्त काढण्यात आलेल्या हल्ला महल्ला मिरवणुकीत पोलिसांवर हल्ला करण्यात आला होता. या हल्ल्यात अनेक कर्मचारी, अधिकारी जखमी झाले होते. परंतू घटनेनंतर अनेक जण फरार झाले होते. त्यातील एक असलेला हरविंदर उर्फ लकी गुरुदीपसिंघ लांगरी हा होता. २९ मार्च २०२१ पासून तो फरार होता. लकी हा बडपुरा येथील घरी आल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.